लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM

नागपूर, मंगळवार, ११ ऑक्टोबर २०१६ 

# जलसंकट नैसर्गिक नसून मानवनिर्मित - डॉ. राजेंद्र सिंग

**प्रतिनिधी, नागपूर**

**जगात जलसंकट** आहे. निसर्गाने भरभरून दिलेले जलरूपी वरदान आपण केवळ अज्ञानामुळे गमावतो आहे. जलसंकट नैसर्गिक नसून मानवनिर्मित असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेंद्र सिंग यांनी व्यक्त केली. तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयातर्फे आयोजित 'जलसुरक्षा परंपरागत पद्धत, जनसहभाग आणि शाश्वत सामूदायिक विकास' या राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.




**सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेंद्र सिंग बीजभाषण करताना. व्यासपीठावर डावीकडून डॉ. तु. वि. गेडाम, राजकुमार तिरपुडे, प्राचार्य डॉ. केशव पाटील आणि डॉ. दीपक मसराम.**

डॉ. सिंग म्हणाले, जलसंकट ही जागतिक समस्या असली तरी स्थानिक प्रयत्नांना बळकटी आणणे आवश्यक आहे. पाऊस पडण्याचे प्रमाण कमी झालेले नाही.पडलेल्या पावसाला धरतीच्या पोटात सूर्यापासून लपवण्याचे काम आपण केलेले नाही. त्यामुळे पाण्याची पातळी खोल जात आहे. पाणी व्यवस्थापन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून देशातील प्रत्येक नागरिकाने यासंबंधी कृती करणे आवश्यक आहे. भारतातील एकूण धरणांपैकी ४० टक्के धरणे ही महाराष्ट्रात असूनही मराठवाडा व विदर्भावर पाणी संकट आहे. जलसंवर्धन, जलबचत आणि जलव्यवस्थापनाच्या ज्या प्राचीन, पारंपरिक व प्रचलित पद्धती होत्या, त्यांचे संवर्धन आपण करू शकलो नाही. अजूनही वेळ गेली नाही. 'समुदाय केंद्रित विकेंद्रीकरण जलव्यवस्थापन' हे धोरण स्वीकारून शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या शैक्षणिक केंद्रांना कृती केंद्रात परावर्तित करावे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने युवाशक्तीला सक्रिय करावे. ते ज्या भौगोलिक परिसरातून आले आहेत. तेथे त्यांना पाण्याशी पर्यावरणाशी संबंधित कार्याला प्रवृत्त करावे व त्यांचे मूल्यांकन महाविद्यालयांनी गुणांच्या स्वरूपात करावे, जलसाक्षरतेचे अभ्यासक्रम तयार करून प्रशिक्षित जलदूत लक्षणीय परिवर्तन आणू शकतात आणि विदर्भाचे पाणीसंकट तात्काळ दूर होऊ शकते.

परिसंवादाच्या अध्यक्षीय भाषणात युगांतर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजकुमार तिरपुडे यांनी पाणी प्रश्नावर संस्थेतर्फे केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करीत पुढेही जलप्रश्नावर काम करण्याची तयारी दाखवली. विदर्भ पर्यावरण संवर्धन संस्थेचे सचिव दिलीप गोडे यांनी जलस्त्रोतांवरील जलहक्क या विषयावर तर सेवाग्रामच्या नई तालीमचे प्रभाकर पुसदकर यांनी प्रत्यक्ष कार्याच्या आधारावर जलव्यवस्थापनाच्या लोकसहभागावर अनुभव कथन केले. इमॅजिसचे संचालक डॉ. संदीप शिरखेडकर यांनी जलव्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा सहज उपयोग सोपा करून सांगितला.

प्राचार्य डॉ. केशव पाटील यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. टी.व्ही. गेडाम यांचेही भाषण झाले. संचालन चर्चासत्राच्या संयोजक डॉ. अरुणा गजभिये यांनी तर निमंत्रक डॉ. दीपक मसराम यांनी आभार मानले. संयोजनात डॉ. शिल्पा पुराणिक, सचिन हुंगे, पल्लवी जांभुळकर, स्मिता आष्टनकर, हेमंत खेडीकर, महेश गौतम, डॉ. आर्शिया हकीम, डॉ. पराग बोंबटकर आणि इतरांचे सहकार्य लाभले.